जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,ठाणे
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक १७.०७.२०२६**

''अवैध विदेशी दारु विक्री करणाऱ्या बॉम्बे डोअर, रेस्टो बारवर पोलीसांची कारवाई''

दिनांक १६/०७/२०२६ रोजी गोपनीय बातमीदारा मार्फत वरिष्ठ पोलीस निरीक्षक/ श्री.अभय महाजन, राबोडी पोलीस ठाणे यांना माहिती मिळाली की, बॉम्बे डोअर, रेस्टो बार, माजीवाडा ब्रिजच्याजवळ, ठाणे येथे विनापरवाना विदेशी दारुची विक्री करण्यात येते तसेच सदर हॉटेल मध्ये टिंडर ॲपव्दारे गिऱ्हाईकांची फसवणुक होत असल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्या होत्या.

वरील माहितीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक/श्री.अभय सी. महाजन, पोलीस निरीक्षक (गुन्हे)/श्री.कृष्णा भोये, सपोनि/संदेश गावंड, पोउपनि/वाल्मीक डाके, पोहवा/सावंत, पोअंम/रोकडे, पोअंम/पवार, पोअंम/कोळी यांनी दोन पंचासमक्ष नमुद आस्थापनेवर छापा कारवाई केली असता, हॉटेल मॅनेजर यांचेकडे दारु विक्रीच्या परवान्याबाबत विचारणा केली असता, दारु विक्रीचा परवाना नसल्याचे सांगीतले. पंचासमक्ष हॉटेलचे काऊंटर व काऊंटर मागील भागाची पाहणी केली असता, वेगवेगळया कंपीनीच्या विदेशी दारुच्या बॉटल किंमत १,२८,७०५/-रु मिळुन आल्यावरुन पोशि/४०३६ रोकडे यांचे फिर्यादीवरुन राबोडी पोलीस स्टेशन येथे आरोपी नामे १) अंकित दिनेश त्रिपाठी वय- २८ वर्षे, रा.बॉम्बे डोर रेस्टो हॉटेलच्या स्टाफ रूम मध्ये नागोरी हॉटेलच्या समोरील माजिवाडा ब्रिज जवळ, ठाणे पश्चिम २) प्रदीप मेवालाल तिवारी, वय ३३ वर्षे, रा.वरीलप्रमाणे ३) शेखर चव्हाण, रा. दोस्ती अंपार्टमेन्ट बाळकुम ठाणे, यांचे विरुध्द गुन्हा रजिस्टर क्रमांक १६६/२०२६, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई), ६८, ८३ प्रमाणे कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान आणखी आरोपी निष्पन्न होण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी श्री.बाळासाहेब पाटील,पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-०१, ठाणे, श्री.संभाजी जाधव, सहा. पोलीस आयुक्त, नौपाडा विभाग यांचे मार्गदर्शखाली राबोडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक/श्री.अभय महाजन, पोलीस निरीक्षक (गुन्हे)/श्री.कृष्णा भोये, सहायक पोलीस निरीक्षक/संदेश गावंड, पोलीस उप निरीक्षक/वाल्मीक डाके, पोहवा/२४५८ सावंत, पोशि/४०३६ रोकडे, पोशि/७६०७ पऱ्हाड, पोशि/४२५७ पवार, पोशि/१२१३ कोळी, सर्व नेमणुक राबोडी पोलीस स्टेशन, ठाणे शहर यांनी केलेली आहे.


Budweiser
Budweiser